
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 5 एप्रिल 2026 | अंक क्र. 316 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






# सोलापूर जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीटीचा कहर

सोलापूर : यंदाच्यावर्षी सोलापूर जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट कहर केला असून, मार्च महिन्यातील पाच दिवस गारपीट आणि अवकाळी पाऊस पडला आहे. यात महसूल प्रशासनाच्या प्राथमिक अंदाजानुसार 2439.05 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

द्राक्ष, गहू, आंबा, डाळिंब यासारख्या नगदी पिकांचा नुकसानीत समावेश आहे. सध्या ग्लोबल वॉर्मिंगचा समस्या निर्माण झाल्याने वातावरणात सातत्याने बदलत आहे. कधी अधिवृष्टी तर कधी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत सापडत आहे. गेल्या वर्षी मे महिन्यापासून ते सप्टेंबर महिन्यापर्यंत मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने महापूर व अतिवृष्टी झाली. आता यंदाच्या वर्षी देखील गारपीट, अवकाळी पावसामुळे शेतकरी बेजार झाले आहेत. या गारपीटीचा फटका जिल्ह्यातील 170 गावांना बसला असून त्यातून 3423 शेतकरी बाधित झाले आहेत. यात 264.7 हेक्टर वरील जिरायती पिके तर 830.75 हेक्टर वरील बागायती पिकांची नुकसान झाली आहे.

फळ पिकाच्या सर्वाधिक नुकसान झाले असून यात 1343.6 हेक्टर क्षेत्रावरील क्षेत्रावरील फळपिकांचा समावेश आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील आठ गावांना गारपिटीचा तडाका बसला असून, 429 शेतकरी बाधित झाले आहेत. त्यात द्राक्षे, आंबा, केळी, खरबूज, ढोबळी मिरची, ज्वारी हरभरा, गहू, डाळिंब यासारख्या 227.45 हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नुकसान झाली आहे.

# राजकीय वर्तुळात मोठी खळबळ बच्चू कडू यांच्यावर हत्येचा कट रचल्याचा आरोप

# बच्चू कडूंचे जोरदार प्रत्युत्तर

■ मुंबई: वृत्तसंस्था

राजकीय वर्तुळातून एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या अडचणीत वाढ झाली असून, त्यांच्यावर हत्येचा कट रचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी अमरावती ग्रामीण पोलिसांनी बच्चू कडू यांच्यासह तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



## नेमके प्रकरण काय?

■ भाजप आमदार प्रवीण तायडे यांचे चुलत भाऊ, अभिजीत तायडे यांनी पोलिसांकडे तक्रार केली आहे. राजकीय वैमनस्यातून बच्चू कडू यांनी आपल्याला अपघाताच्या बहाण्याने ठार मारण्याचा कट रचला होता, असा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, या खळबळजनक आरोपामुळे राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडाली आहे.

## बच्चू कडू यांची पहिली प्रतिक्रिया

■ आपल्यावर झालेले सर्व आरोप फेटाळून लावत बच्चू कडू यांनी संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, "कट रचणे हा आमचा धंदा नाही. आम्ही रक्तदान करणारे आणि इतरांना जीवन देणारे लोक आहोत. कोणाचा जीव घेणे हे आमचे काम नाही. शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान मिळावे, यासाठी मी आंदोलन करणार होतो. म्हणूनच मला बदनाम करण्यासाठी आणि माझ्या कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्यासाठी हे षड्यंत्र रचले गेले आहे."

## "मी स्वतःहून अटक करून घेईन": बच्चू कडू

■ पुढे बोलताना बच्चू कडू यांनी एक मोठे विधान केले आहे. ते म्हणाले, "आमचा आवाज अशा प्रकारे दाबण्याचा प्रयत्न होत असेल, तर मी स्वतःहून अटक करून घेईन. प्रभू रामचंद्रांच्या राम मंदिरात जाऊन मी पोलिसांना अटक करून घेण्यास सांगेन. तसेच, मी उद्यापासून एव्हरेस्ट बेस कॅम्पच्या मोहिमेवर चाललो आहे." या प्रकरणाने आता अमरावतीसह राज्यातील राजकारणात मोठा वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे. या आरोपामुळे आता पोलीस तपास कोणत्या दिशेने जातो आणि बच्चू कडूंच्या या आव्हानावर प्रशासनाची काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


# आंगणेवाडीचा भक्तीमय सोहळा उत्साहात संपन्न


■ सिंधुदुर्ग वृत्तसंस्था

'कमलपदी तव नमितो माते जयजय भराडी देवी...... जय जय भराडी देवी......!' असा ध्वनीक्षेपकावर चालु असलेला देवीचा गजर, आणि महाप्रसादाचा सोहळा पाहण्यासाठी देवालयाच्या प्रांगणाबाहेर उसळलेली भक्तांची गर्दी असाच नजारा सोमवारी रात्री आंगणेवाडीत पहावयास मिळाला. महाप्रसाद ताटे लावण्याच्या कार्यक्रमासाठी ९.५० वाजता बंद झालेली दर्शन रांग पुन्हा रात्री १ नंतर चालू झाली. सकाळच्या सत्रा बरोबरच सायंकाळी भाविकानी उच्चांकी गर्दी अनुभवली. मंगळवारी सुद्धा भाविकांच्या गर्दीने आंगणेवाडी यात्रा परिसर फुलुन गेला होता. प्रती पंढरपुर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व नवसाला पावणाऱ्या आंगणेवाडीच्या श्री भराडी देवीच्या यात्रोत्सवाची सांगता मंगळवारी सायंकाळी उशिरा उत्साहात झाली. दरम्यान भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी कुटुंबिया समवेत रात्री भराडी मातेचे दर्शन घेतले. यावेळी कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा बँक उपाध्यक्ष अतुल काळसेकर, बंड्या सावंत आदी उपस्थित होते. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, प्रांत ऐश्वर्या काळुशे, जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ मोहन दहिकर यांनी मंगळवारी आई भराडीचे दर्शन घेतले. दोन दिवसात आंगणेवाडीत सुमारे आठ लाख भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. मंदिर परिसरातील दर्शन रांगांमधील भाविकांचा ओघ मंगळवारी सायंकाळनंतर चालूच होता. मंगळवारी आंगणे ग्रामस्थानी देवीचे दर्शन घेऊन ओट्या भरल्या. आंगणे कुटुंबीय आंगणेवाडी यांनी देवीच्या भक्तांसाठी मंगळवारी सुद्धा सायंकाळपर्यंत नवस बोलणे, फेडणे व ओटी भरणे आदी विधी देवीच्या आशीर्वादाने चालू ठेवले होते.

यात्रोत्सवातील महत्वाचा असा महाप्रसादाची ताटे लावण्याचा कार्यक्रम शनिवारी रात्री ९.५० वा. सुरु झाला. प्रथम मानकऱ्यांची प्रसादाची ताटे देवीच्या प्रांगणात सवाष्ण महिलांकडून डोक्यावरुन आणण्यात आली. यानंतर सर्व ग्रामस्थांच्या घरात बनवलेली महाप्रसादाची ताटे लावण्याचा कार्यक्रम पाहण्यासाठी देवीच्या प्रांगणात भक्तानी गर्दी केली होती. ताटे लावणे कार्यक्रम दरम्यान आंगणेवाडीतील सवाष्ण महिलांचा मेळाच देवालयाच्या मागील प्रांगणात भरला होता. सोमवारी उत्तर रात्री गर्दीचा ओघ वाढला

सायंकाळनंतर भाविकांची गर्दी उत्तरोत्तर वाढत गेली. रात्री बारानंतर तर देवालयाच्या बाहेरील परिसरात रस्त्यावरुन चालणे अवघड बनले होते. यात्रेच्या दोन दिवसात लाखो रुपयांची उलाढाल झाली. मनोरंजनाच्या खेळण्यांच्या भागात बच्चे कंपनीची गर्दी झाली होती. यात्रोत्सवात सेवा दिलेल्या शासनाच्या सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी यांचे यावेळी आंगणे कुटुंबिय आंगणेवाडी यांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले. मोड जत्रेत शेतीची अवजारे व गृहपयोगी साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी झाली होती. सिंधुदुर्ग जिल्हा बँकेच्या बचतगटांच्या स्टॉलना चांगला प्रतिसाद मिळाला. गेले दोन दिवस दुरवरुन आलेल्या भक्तगणांमुळे आंगणेवाडी परिसर फुलुन गेला होता.



# संपादकीय

## इंधन दरवाढीला 'ब्रेक' ?

जागतिक राजकारणात निर्माण झालेला तणाव आणि लांबलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय तेल बाजारात सध्या प्रचंड उलथापालथ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात (Excise Duty) १० रुपयांची कपात करून सर्वसामान्यांना तात्पुरता दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, हा दिलासा म्हणजे इंधन स्वस्त होण्याचे संकेत नसून, भविष्यातील मोठ्या दरवाढीला थोपवण्याचा एक प्रयत्न असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे 'होर्मुझ सामुद्रधुनी'मधील तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. इराणच्या नाकेबंदीमुळे जगातील तेलपुरवठ्याची गणिते बिघडली आहेत. अमेरिका, पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळ यांसारख्या देशांत इंधनाचे दर ५० टक्क्यांहून अधिक वाढले असताना, भारताने रशियाकडून होणारी तेल आयात आणि उपलब्ध साठ्यामुळे स्वतःला सावरले आहे. फक्त इंधनच नव्हे, तर गॅस आणि उद्योगांचीही कोंडी हा प्रश्न केवळ पेट्रोल-डिझेलपुरता मर्यादित नसून त्याचे परिणाम इतर क्षेत्रांवरही दिसू लागले आहेत: लांबलेल्या युद्धाने जगभरातील तेल बाजारात हाहाकार माजलेला असताना केंद्र सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात केलेली दहा रुपयांची कपात, हा तात्पुरता दिलासा म्हणावा लागेल. या निर्णयाद्वारे पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रतिलिटर १३ रुपयांवरून तीन रुपये होणार असून डिझेलवरील उत्पादन शुल्क रद्द होणार आहे. या सवलतीमुळे ग्राहकांसाठी इंधनाच्या किमती कमी होण्याची सुतराम शक्यता नाही; मात्र आंतरराष्ट्रीय तेल बाजार भडकल्याने तेल कंपन्यांना सोसावा लागणारा तोटा काही प्रमाणात कमी होऊ शकतो आणि ग्राहकांसाठी संभाव्य दरवाढ टळू शकते किंवा काही काळापुरती लांबणीवर जाऊ शकते, एवढे नक्की. विरोधी पक्षांच्या आरोपानुसार, येत्या महिन्यात होऊ घातलेल्या पाच विधानसभांच्या निवडणुकांमध्ये या संभाव्य इंधन दरवाढीचा राजकीय फटका बसू नये, असा आनुषंगिक मुद्दा सत्ताधाऱ्यांनी विचारात घेतला असेलच. विरोधी पक्षांच्या मते, आगामी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारने ही शुल्क कपात केली आहे. निवडणुका संपल्यानंतर आणि युद्ध अधिक लांबल्यास इंधनाचे दर पुन्हा भडकण्याची 'टांगती तलवार' कायम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशाला 'कोरोना'सारख्या कठीण परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार राहण्याचे संकेत दिले आहेत. इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने दिलेली इंधन सवलत हा केवळ एक 'अर्धविराम' ठरू शकतो. जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर भडकलेले असताना देशांतर्गत दर स्थिर ठेवण्यासाठी सरकारने स्वतःच्या तिजोरीवर भार घेतला आहे. मात्र,

### हे चित्र किती काळ टिकणार?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत दिलेला 'कोरोनासारख्या मोठ्या आव्हानाचा' इशारा आणि प्रत्यक्षात पेट्रोल पंपांवर लागलेल्या रांगा, यात विरोधाभास जाणवत आहे. एकीकडे सरकार गॅस टंचाई नाकारत आहे, तर दुसरीकडे हॉटेल-खानावळी बंद पडत आहेत. अफवांच्या बाजारामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या संकटाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, देशाला आता 'ऊर्जा सुरक्षेसाठी' केवळ आयातीवर अवलंबून न राहता दीर्घकालीन आणि स्वावलंबी उपाययोजनांची नितांत गरज आहे. फसलेला अंदाज: युद्ध लवकर संपेल हा पाश्चिमात्य देशांचा दावा फोल ठरला; होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांमुळे जागतिक तेलकोंडी झाली. भारताची स्थिती: रशियाकडून तेल येत असल्याने आपण सुरक्षित असलो तरी तेल कंपन्यांना प्रतिलिटर २५ रुपये अधिक सोसावे लागत आहेत. गॅसचे कोलमडलेले गणित: सरकारी आश्वासनांनंतरही प्रत्यक्षात गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय आणि कारखाने संकटात आहेत. दुहेरी फटका: एकीकडे आयात महागल्याने रुपया कमकुवत होतोय, तर दुसरीकडे निर्यात रखडल्याने शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या हत्येनंतर युद्ध आठवडाभरात संपेल, हा अमेरिका आणि इस्रायलचा अंदाज साफ फोल ठरला आहे. उलटपक्षी, होर्मुझ सामुद्रधुनीतील इराणच्या नाकेबंदीने जागतिक तेल पुरवठ्याचे गणित पूर्णपणे विस्कळीत केले आहे. याचे पडसाद आता थेट भारताच्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचले आहेत.

अर्थव्यवस्थेला घरघर: शेजारील देश आणि खुद्द अमेरिकेत इंधन दर ५०% ने वाढले असताना, भारताने रशियाकडून होणारी आयात आणि साठ्यामुळे स्वतःला सावरले आहे. मात्र, तेल कंपन्यांचा तोटा ३ हजार कोटींच्या वर गेल्याने सरकारने उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात करून तात्पुरता 'दिलासा' दिला आहे. संकट केवळ इंधनाचे नाही: युद्धामुळे केवळ पेट्रोल-डिझेलच नव्हे, तर खते आणि गॅसचा पुरवठाही विस्कळीत झाला आहे. यामुळे हॉटेल, पर्यटन आणि उत्पादन क्षेत्राला मोठा फटका बसला असून बेरोजगारीची भीती निर्माण झाली आहे.

शेतकरी आणि व्यापाऱ्यांची चिंता: आखाती देशांत जाणारी फळे आणि शेतीमालाची निर्यात रखडल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर संकटाचे ढग आहेत. रुपयाची घसरण आणि वाढती आयात यामुळे देशाच्या आर्थिक चक्राला गती देणे हे सरकारपुढील सर्वात मोठे आव्हान आहे.



## लोकार्थ

### फ्रँकलिन टेम्पलटनचा 'सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफ' फंड



फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने स्पेशलाइज्ड इन्व्हेस्टमेंट फंड्स (एसआयएफ) अंतर्गत आपली पहिली योजना सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफ योजनेचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली. एसआयएफ नियमावलींतर्गत आणण्यात आलेली ही योजना इक्विटी लाँग शॉर्ट फंड आहे. हा फंड लार्ज, मिड आणि स्मॉल-कॅप श्रेणीमध्ये वैविध्यपूर्ण गुंतवणूक करण्यासाठी निफ्टी ५०० निर्देशांकातील समभागांमध्ये गुंतवणूक करतो. या फंडाचे मुख्य उद्दिष्ट मार्केटच्या चढ-उतारांमध्ये दीर्घकालीन भांडवलवृध्दी आहे. हा फंड स्वतः विकसित केलेल्या गणितीय आणि आकडेवारीच्या प्रारुपावर आधारित असून त्यात अतिशय विचारपूर्वक समभागांची निवड, गरजेनुसार गुंतवणुकीचे प्रमाण बदलणे आणि गुंतवणुकीतील धोका कमी करण्यासाठी नियमांचे कसोशीने पालन केले जाते. या फंडाचा एनएफओ (न्यू फंड ऑफर) गुंतवणुकीसाठी १० एप्रिल २०२६ पासून खुला होणार असून २४ एप्रिल २०२६ ला बंद होणार आहे. फ्रँकलिन टेम्पलटन - इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवलेकर या फंडाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना म्हणाले, आजचा शेअरबाजार हा खूप वेगाने बदलत चालला असून गुंतवणूकदारांसाठी शिस्तबद्ध आणि लवचिक गुंतवणूक धोरण राबविणे अत्यंत गरजेचे झाले आहे. एसआयएफ फंड्स अधिक जोखीम घेणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी बनविण्यात आलेला असून यामध्ये उच्च परतावा मिळण्याची शक्यता असते आणि हा फंड कर कार्यक्षम देखील आहे.

### भारती एअरटेलची नेक्स्ट्रा डेटामध्ये US$1 अब्जची गुंतवणुक

भारती एअरटेल यांनी जाहीर केले की अल्फा वेव्ह ग्लोबल, कार्लाइल आणि अँकरेज कॅपिटल यांच्या सहयोगी संस्थांमार्फत नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड मध्ये १ अब्ज अमेरिकन डॉलर गुंतवणूक करण्यात येणार आहे. नेक्स्ट्रा ही एअरटेलची डेटा सेंटर व्यवसायातील उपकंपनी असून, भारतभर तिच्या नेटवर्कचा विस्तार आणि वाढीला गती देण्यासाठी ही गुंतवणूक केली जात आहे. एअरटेल देखील या गुंतवणूक फेरीत सहभागी होणार आहे.या करारानुसार, अल्फा वेव्ह ग्लोबल ४३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स, कार्लाइल २४० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स आणि अँकरेज कॅपिटल ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स गुंतवणूक करणार आहेत, तर उर्वरित रक्कम एअरटेलकडून दिली जाईल. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर आवश्यक समायोजनांच्या अधीन राहून गुंतवणूकदारांचा अंतिम समभाग वाटा निश्चित केला जाईल. नेक्स्ट्रा मध्ये एअरटेलचा नियंत्रक हिस्सा कायम राहणार आहे. हा व्यवहार भारतातील नियामक मंजुरींवर अवलंबून आहे.




### कौटुंबिक नाते घट्ट करणारी डेटॉलची नवीन मोहीम

भारताचा आघाडीचा जंतूनाशक ब्रँड 'डेटॉल'ने त्यांच्या नामांकित डेटॉल अँटीसेप्टिक लिक्वीडसाठी एक नवीन भावूक मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम ब्रँडचे कुटुंबांशी असलेले नाते अधिक घट्ट करण्यासाठी आणि डेटॉलचे अतुलनीय संरक्षण अधोरेखित करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. आईच्या मुलांप्रती असलेल्या नैसर्गिक काळजीच्या जागतिक सत्यावर आधारित ही मोहीम, "आई आणि डेटॉलसारखे संरक्षण दुसरे कोणीही देऊ शकत नाही" हा विचार मांडते.पिढ्यानपिढ्या, डेटॉल हे केवळ एक उत्पादन नसून संकटाच्या काळात एक आधार देणारे सोबती बनले आहे. ही नवीन फिल्म लग्नाच्या घरातील धावपळीच्या वातावरणात एका हळव्या क्षणाद्वारे हा भावनिक गाभा मांडतो. डेटॉल पोर्टफोलिओचा कणा म्हणून, डेटॉल अँटीसेप्टिक लिक्विड जखमा आणि कापलेल्या भागासाठी आजही अतुलनीय संरक्षण देत आहे, ज्यामुळे पिढ्यानपिढ्या कुटुंबांना सुरक्षित ठेवण्यातील त्याची भूमिका अधिक भक्कम होत आहे.



### स्टेलँटिस इंडियाचे गोव्यात 'काकुलो मोटर्स' डीलरशिप

स्टेलँटिस इंडियाने गोव्यातील आपल्या स्टेलँटिस ब्रँड हाऊस फॉरमॅटच्या 'काकुलो मोटर्स' या डीलरशिपच्या उद्घाटनाची घोषणा केली. या नवीन 3S सुविधेचे उद्घाटन गोव्याचे माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, स्टेलँटिस इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ शैलेश हझेला व काकुलो ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मनोज एम. काकुलो यांच्या उपस्थितीत करण्यात आले. जीप® आणि सिट्रोएन या ब्रँड्सना एकाच छताखाली आणणारे, गोव्यातील स्टेलँटिस ब्रँड हाऊस ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांनुसार तयार केलेला एक आधुनिक, आकर्षक रिटेल अनुभव सादर करते. एक अखंड फिजीटल इकोसिस्टम म्हणून डिझाइन केलेली ही सुविधा ग्राहकांना डिजिटल आणि प्रत्यक्ष अशा दोन्ही माध्यमांतून माहिती मिळवण्यास, सहभागी होण्यास आणि व्यवहार करण्यास सक्षम करते, ज्यामुळे सोय, पारदर्शकता आणि वैयक्तिकरण मिळते. नवीन एसबीएच प्रकल्पामुळे स्टेलँटिस इंडियाचे पश्चिम विभागातील अस्तित्व अधिक मजबूत होते आणि जीप व सिट्रोएनची आरामदायी उत्पादन श्रेणी तसेच ग्राहक-केंद्रित सेवा उत्तर आणि दक्षिण गोव्यातील ग्राहकांच्या अधिक जवळ येतात.

■ **संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता : डॉ. राजेंद्र बगाटे

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, NIRF १०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो.

या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय.

याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते. या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात.

यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो. याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो. या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.

शिक्षण, समानता आणि संविधानिक मूल्यांवरील परिणाम :- दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशाच्या परिणामांचा विचार केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही; कारण या निर्णयाचा सर्वात थेट आणि दीर्घकालीन परिणाम शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेवर, शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजातील समतेच्या संकल्पनेवर होणार



आहे. या आदेशानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा आधार घेतला जात असल्यामुळे, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेतच असमानतेची बीजे पेरली जात आहेत.

शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल. या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे. संविधानाच्या दृष्टीने पाहिले असता, भारतातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना पुढे आणण्यासाठी अनेक विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु या शासन आदेशामुळे या घटकांना प्रत्यक्षात स्पर्धेबाहेर ढकलले जात आहे. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते; परंतु जर शिक्षणाच्या संधीच मर्यादित केल्या गेल्या, तर सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरेल.\ या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात. परंतु त्यांच्या विद्यापीठांचा क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी लेखले जाते. यामुळे या विद्यापीठांची प्रतिष्ठा कमी होते आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.


याचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे गुणवत्तावान विद्यार्थी आणि शिक्षक किंवा प्राध्यापक हे मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, स्थानिक विद्यापीठे कमकुवत होतात. त्यांच्याकडे संसाधनांची कमतरता निर्माण होते आणि त्यांच्या विकासावर परिणाम होतो. ही प्रक्रिया पुढे जाऊन शिक्षणातील प्रादेशिक विषमता अधिक वाढवते. एकीकडे पुणे आणि मुंबईसारखी पिद्यापीठे, शहरे अधिक मजबूत होतात, तर दुसरीकडे इतर भाग मागे पडतात. या धोरणाचा मानसिक परिणामही अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या शिक्षण संस्थेबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढवणारी प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः आदिवासी, दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो, कारण ते आधीच सामाजिक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असतात.

■ **डॉ. राजेंद्र बगाटे, एम.ए, नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. पोस्ट-डॉक्टरेट**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# चला फिरा अरुणाचल प्रदेश

अरुणाचल प्रदेश हे भारत ईशान्येकडील एक लोकप्रिय पर्यटन आहे. येथील झिरो हे सर्वात महत्त्वाचे स्थळ आहे. देवांचे शहर म्हणून याची ख्याती आहे. याठिकाणी एका प्रेरणेपेक्षा काही कमी नाही, दृष्टीस पडेल त्या प्रत्येक कोपऱ्यात एक आश्चर्य आहे आणि अशा बेसुमार ठिकाणांमुळे, अनेकदा एखादा पर्याय सुटू शकतो. गोष्टी सोप्या करून देण्यासाठी, येथे अरुणाचल प्रदेशातील झिरोमधील उत्तम ठिकाणे दिली आहेत.






## दऱ्यातील सर्व मार्ग

अरुणाचल प्रदेशातील टॅली व्हॅली अभयारण्य अनेक पर्यटकांना आकर्षित करते. तो अनेक चिंताजनक प्रजातींचे घर आहे असे म्हणतात. हे ठिकाण ऑर्किड, सिल्व्हर ओक आणि फर्नसह अनेक वनस्पती आणि त्यांच्या प्रजातीने समृद्ध आहे. पाच हजार वर्षे जुन्या आणि बहुतेक १९६२ मध्ये शोध लावण्यात आलेल्या मेघना गुहा मंदिराला नक्की भेट द्या.

## टेकडी चढणे

भर दुपारच्या वेळी आपटनी खोऱ्यातील विखुरलेली ब्लू अल्पाइनची झाडे बिंदू आहेत. ट्रेकिंगसाठी बूट घाला आणि या जागेत मनसोक्त हुंदडा. टोकडीवरील झिरो पुटो म्हणून ओळखले जाणारे ठिकाण प्रशासकीय मूल्य आहे. आपाटनी खोऱ्यात एक नेत्रदीपक दृश्य यामुळे दिसते आहे. हापोलीला जिल्हा प्रशासकीय मुख्यालय वसलेले आहे.

## मासे पकडायला जा

टरिन माश्यांची शेती देवदार आणि बांबूच्या उपवनाच्या दरम्यान जवळ आहे. अनेक माशांचे येथे प्रजनन आहे. बांबूचे उपवन एक रोमांचक ठिकाण आहे. जे निळ्या अल्पाइननेयुक्त आहे आणि हायकिंग आणि लांब ट्रेकिंगसाठी अभ्यागतांना पर्याय देते. टिपी ऑर्किड रिसर्च सेंटरने उष्णदेशीय पाऊस वनामध्ये आसरा घेतलेला आणि हे ऑर्किडच्या सुमारे १००० प्रजातींचे घर आहे. यामुळे पिशव्या पॅक करून अरुणाचल प्रदेशाचे आश्चर्यकारक जग अनुभवण्यास तयार व्हा.

# दैत्यासूर धबधबा



आंबिवलीहून पुढे जामरूग गावाकडे जाणाऱ्या वाटेवरील पुलाच्या आधी उजवीकडे वळल्यावर आपण डुक्कर पाड्यात पोहोचतो. येथूनच पुढे अनेक खासगी फार्म हाऊसचे प्रकल्प आहेत. हे फार्म हाऊस ज्या डोंगराच्या पायथ्याशी बांधले आहेत त्या डोंगराच्या माथ्यावर एक नैसर्गिक भगदाड म्हणजेच नेढे असल्यामुळे याला नाखिंडाचा डोंगर असे स्थानिक संबोधतात. कोथळीगडाच्या मध्यावर असलेल्या पेठेची वाडी गावाच्या समांतर उंचीवर नाखिंडा डोंगरालाही पदर सुटला आहे. (स्थानिके भाषेतील पदर म्हणजे एका विशिष्ट उंचीवर डोंगराला समांतर असलेले विस्तीर्ण पठार) याच पदरावरून अनेक धबधबे रांगेत खाली कोसळत असतात. यातलाच सर्वात मोठा धबधबा म्हणजेच दैत्यासूर धबधबा. कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणारे हे धबधबे सजावटीसाठी लावलेल्या बत्ताशांच्या माळांप्रमाणे भासतात. या धबधब्याच्या तळाशी जाण्यासाठी तासाभराची बिकट चढाई करावी लागते. अजस्त्र धबधब्याचे रौद्र भीषण रूप पाहणे हा वेगळा अनुभव असला तरी तेथे जाणं धोक्याचे आहे. कारण हा प्रपात खूप उंचावरून कोसळत असतो. बिकट चढाईचे श्रम घ्यायचे नसल्यास फार्म हाऊसच्या प्रोजेक्टच्या मागे दोनचार कमी प्रवाहाचे धबधबे आहेत. तेथे पोहोचणे सोपे असून येथे धबधब्या खाली भिजण्याचा आनंद घेता येतो.



## सोलान पाडा बंधारा

कर्जत रेल्वेस्थानकापासून अंदाजे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या जामरूग गावाच्या पुढे सोलान पाडा नावाची छोटीशी वाडी आहे. या वाडीच्या पुढे डोंगर पायथ्याशी हल्लीच एक छोटासा बंधारा बांधण्यात आला. बंधाऱ्याचे अतिरिक्त पाणी वाहून जाण्यासाठी केलेल्या सांडव्याची टप्प्या टप्प्यात उतरत जाणारी अशी विशिष्ट पद्धतीची केलेली बांधणी पर्यटकांच्या लोंढय़ाला कारणीभूत ठरत आहे. धरण भरले की अतिरिक्त पाणी लयबद्ध पद्धतीने एका टप्प्यावरून दुसऱ्यावर, दुसऱ्यावरून तिसऱ्या टप्प्यावर ओसंडून वाहू लागते आणि पाहणाऱ्याला एकावर एक असे अनेक धबधबे पहिल्याचा आनंद मिळतो. हे टप्पे जास्त खोल नसल्यामुळे येथे भिजण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी जमते. अर्थात ही गर्दी टाळून थोडसे मागे डोंगराजवळ जायला हरकत नाही. अगदीच डोंगरधारेला लागून असलेल्या या धरणाच्या जलाशयाच्या नयनरम्य देखाव्याला सुरेख जोड लाभली आहे ती पाठीशी उभ्या असलेल्या कातळ भिंतीवरून रांगेत कोसळणाऱ्या धबधब्यांची. नजर खिळवून ठेवणारा असाच हा नजारा म्हणावा लागेल. गेल्या दोन वर्षांपासून सोशल मीडियावरून होणाऱ्या मोठ्या प्रसिद्धीमुळे सुट्टीच्या दिवशी येथे हजारोंच्या संख्येने पर्यटक जमू लागले आहेत. त्यामुळेच सुट्टीचे दिवस टाळून मध्येच एखादी खास रजा काढून येथे आवूर्जन भेट द्यायला हरकत नाही.

# खडसांबळे लेणी

अष्टविनायकातील पाली गावापासून १४ किलोमीटर अंतरावर खडसांबळे नावाचे एक छोटेसे गाव आहे. याच गावाच्या पाठीमागे डोंगरात मध्यावर एक लेणी समूह कोरलेला आहे. चहू बाजूने जंगलाने वेढलेल्या या लेण्यांना भेट द्यायची झाल्यास गावातून वाटाडय़ा घेणे आवश्यक ठरते. गावापासून लेण्यांपर्यंत पोहोचायला तासाभराची सोपी चढाई करावी लागते. पण थोडे कष्ट घेऊन पठारावर पोहोचताच येथील हिरवाईने नटलेला निसर्ग पाहून घेतलेल्या श्रमाचे चीज होते. दूर दूरवर पसरलेले हिरवे गवताच्छादीत पठार, त्यापलीकडे गुटख्यापासून ते थेट हिरडीपर्यंत (गुटखा-हिरडी ही घाटमाथ्यावरील गावे आहेत) आडवी पसरलेली सह्यधार आणि त्यावरून मुसंडी मारून वाहणारे अनेक धबधबे असा नयनरम्य देखावा निरखत पुन्हा जंगलात शिरायचे आणि थेट लेणी गाठायची.



लेण्यांच्या समोर येताच विशेष लक्ष वेधून घेतो तो येथील विस्तीर्ण सभागृह. मात्र दरड कोसळून व छत खचून त्यातील बहुतांश गुहांचा प्रवेश बंद झाला आहे. डोंगरमाथ्यावरून ओघळणारे पाणी लेणींच्या थेट पुढय़ात कोसळते. श्रावणात येथे गेल्यास या पाण्यावर पडणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांमुळे पाण्यात एकात एक गुरफटलेली अनेक इंद्रधनुष्य पाहायला मिळतात. खडसांबळे लेण्यांची सफर एका अपरिचित वारसास्थळाची भेट आणि सुगम्य जंगल भटकंती असा दुहेरी आनंद देऊन जाते.

# विवाह सोहळ्यासाठी शाही ठिकाणे

प्रत्येकाच्या आयुष्यात विवाह सोहळा हा फार महत्त्वाचा असतो. तो चांगल्या पद्धतीने आणि चांगल्या ठिकाणी करणे ही सगळ्यांची इच्छा असते. तसेच हे क्षण आयुष्यभर आठवणीत राहतात. याला अधिकच रोमँटिक करण्यासाठी निवडा पुढील शाही ठिकाणे...

## शाही राजस्थान

ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्यामुळे राजस्थान नेहमीच शाही थाटासाठी ओळखला जातो. राज पॅलेस, राम बाघ पॅलेस आमी जय महाल पॅलेस येथे लग्न सोहळा तुमच्यासाठी अविस्मरणीय ठरू शकतो. उदयपूर येथील द लेक पॅलेस हॉटेल हा आणखी सर्वोत्तम ऑप्शन असू शकतो. राजस्थानमधील जयपूर, उदयपूर आणि जोधपूर ही शहरे देशातील प्रमुख शहरांशी रस्ते मार्गाने जोडली गेली आहेत.

## ॲडव्हेंचरस अंदमान

हिरवाईने नटलेला भूप्रदेश, स्वच्छ पाण्याचा अथांग समुद्र आणि सुंदर किनारा अशी पार्श्वभूमी लग्न सोहळ्यासाठी अतिशय उत्तम ठरू शकते. अंदमान-निकोबार बेटे एक सध्या भारताती उत्तम वेडिंग डेस्टिनेशन्सपैकी एक मानले जाते. ॲडव्हेंचरची हौस असणाऱ्या कपल्स ना येथे वॉटर स्पोर्टस्‌चा आनंद देखील घेता येऊ शकतो. येथे तुम्ही हवाई मार्गाने तसेच समुद्रमार्गे जहाजातून जावू शकता.



## हाऊसबोट

लग्न सोहळ्यासाठी समुद्र किनारा असलेले आणखी एक ठिकाण म्हणजे केरळ. तुम्हाला शांतता अनुभवायाची तर केरळ अतिशय सुंदर आहे. कोल्लम, कोटी आणि वरका येथील बॅकवॉटरमध्ये असलेल्या हाउस बोटमध्ये लग्न समारंभ संस्मरणीय ठरू शकते. येथे बस, कार, रेल्वे आणि विमानानेही जाऊ शकता.



# मिझोराम

मिझोराम हे ईशान्येकडील सात राज्यांतील एक छोटेसे राज्य. मिझोरामची राजधानी असलेले ऐझवाल हे गुवाहाटीपासून ५०६ कि.मी., शिलाँगपासून ४५० कि.मी. आणि इम्फाळपासून ३७४ कि.मी. दूर आहे. सिलचर हे जवळचे रेल्वेस्थानक असून ते १८४ कि.मी. अंतरावर आहे. सर्व रस्ते सिलचरमार्ग्रेच जातात. त्यामुळे रस्त्याने ऐजवाल गाठायला गुवाहाटीपासून दीड दिवस लागतो. गुवाहाटी व कोलकाता येथून विमानाने ऐझवालला येता येते.

मिझोराम हे हिरव्यागार डोंगररांगांनी व्यापलेले आहे. राज्याचे सर्वात उंच शिखर फावांगपुई (७०७५ फूट) हे म्यानमारच्या सीमेवर आहे. या डोंगररांगेला ब्ल्यू माउंटन म्हणून ओळखले जाते. राज्याची भाषा मिझो असल्याने येथील लोकांशी संपर्क साधताना भाषेची थोडी अडचण येते. मुख्य उत्पन्नाचे साधन शेती. तीही जंगल कापून काही काळासाठी करण्यात येते. येथे बांबूची लागवड मोठ्या प्रमाणात होत असल्याने दैनंदिन गरजांसाठी बांबूचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे तेथे आपल्याला घरेही बांबूचीच पाहायला मिळतील. मिझो संस्कृतीतील दहा नृत्यप्रकारांपैकी चेराव म्हणजे बांबूनृत्य पर्यटकांसाठी पर्वणी असते. ऐजवालमधील झुलॉजिकल पार्क, म्युझियम प्रेक्षणीय आहे. तेथील बडा बाजार नावाची मुख्य बाजारपेठ प्रसिद्ध आहे. इथल्या हॉटेलांत चायनीजबरोबरच भात, भाकरी, वरण हमखास मिळते.

ऐझवालपासून ८५ किमीवर प्रेक्षणीय तामदिल तलाव, १५२ किमीवर ७५० फूट उंचीचा वांटावांग धबधबा व १३३ कि.मी.वर दाम्पा अभयारण्य आहे. ऐजवालहून खुंआंगचेरा गाव, तेथील छोटे भुयार, रेईक शिखर व तेथील मिझो पर्यटन ग्राम असा एक दिवसाचा गाडीने भटकंतीचा कार्यक्रम करता येतो. मिझोरामच्या भटकंतीसाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी उत्तम असतो. हे सीमावर्ती राज्य असल्याने येथे प्रवेशासाठी परवाना घ्यावा लागतो. हा परवाना दिल्ली, गुवाहाटी येथे मिझोराम सरकारच्या जनसंपर्क कार्यालयांबरोबरच ऐझवाल विमानतळावर मिळतो.

# मेघालय



मेघालय हे ईशान्येकडील राज्यांतील बांगलादेशच्या सीमेला लागून असलेले एक छोटेसे राज्य. नावाप्रमाणेच मेघांचा आलय असलेले सर्वाधिक पर्जन्यमानाचे राज्य. संपूर्ण मेघालय गारो, खासी व जैतिया टेकड्यांनी व्यापलेला आहे. या वेगवेगळ्या टेकड्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या जमातीही या टेकड्यांच्याच नावाने म्हणजे गारो, खासी, जैतिया या नावाने ओळखल्या जातात. मेघालयातील बहुतांश लोकसंख्या ही या जमातींची आहे. सुमारे ३०० प्रकारचे ऑर्किड, दोन राष्ट्रीय उद्याने, अनेक प्रकारचे वन्य प्राणी यांनी समृद्ध असे हे राज्य आहे. येथील भटकंतीसाठी ऑक्टोबर ते एप्रिल हा कालावधी अनुकूल आहे. जून ते सप्टेंबर या दरम्यान येथे प्रचंड पाऊस असतो.

## शिलाँग

गुवाहाटीपासून ९० किलोमीटरवर शिलाँग हे मेघालयाच्या राजधानीचे शहर आहे. येथे सर्व शहरी सुविधा आहेत. प्रवासासाठी बस व जीप गाड्या यांची सेवा चांगली आहे. रस्तेही चांगले आहेत. शिलाँगकडे जाताना १७ किलोमीटर अलीकडे, प्रचंड मोठा असा उमियाम जलाशय आहे. हा सर्व परिसर अत्यंत रम्य आहे. शिलाँगपासून १० किलोमीटरवर शिलाँग शिखर (६४४५ फूट) आहे. येथून शिलाँग शहराचे विहंगम दृश्य पाहायला मिळते.

शहरापासून दहा- बारा किलोमीटरच्या परिसरात स्प्रेड इगल, स्वीट, एलेफंट अशा नावांचे धबधबे आहेत. शिलाँगपासून ५४ कि.मी. अंतरावर चेरापुंजी येथून हिरव्या रंगाने नटलेल्या खोल दऱ्या, मोसमाई, दैन्थलेन, नोहकेलीकाई या नावाचे व असे अनेक धबधबे व बांगलादेशचा पठारी प्रदेश नजरेस पडतो. येथून ५५ किमीवर मोंहसिराम हे आता सर्वाधिक पर्जन्यमान असणारे ठिकाण म्हणून ओळखले जाते. याच पट्ट्यात दऱ्या-खोऱ्यांमध्ये लिविंग रुट ब्रिज हे नैसर्गिक आश्चर्य खास पाहण्याजोगे आहेत. ओढे, नाले ओलांडून जाण्यासाठी असे ३५ अवाढव्य पूल या परिसरात आहेत. खासी जमातीचा नोंगक्रेम सण व गारो जमातीचा वांगाला डान्स नोव्हेंबरमध्ये तर जैतियांचा बेह देन्खलाम सण जुलैमध्ये असतो.



## हजारो भुयारे

आपल्या देशात नैसर्गिक भुयारे फक्त मेघालय राज्यात आहेत. मेघालयाच्या टेकड्यांमध्ये असलेला चुनखडीचा खडक व सर्वाधिक पर्जन्यमान या घटकांमुळे मेघालयात हजारो भुयारांची निर्मिती झाली आहे. ही भुयारं भूगर्भ शास्त्रज्ञ व इतर अभ्यासकांसाठी नंदनवन म्हणावी लागतील. साहसाची व नित्य नव्याचा वेध घेण्याची ओढ असणाऱ्यांसाठी एक आव्हानच आहे. अशा या भुयारातून पृथ्वीच्या अंतरंगाचा वेध घेत केलेल्या साहसी मार्गक्रमणाला केव्हिंग संबोधले जाते. या केव्हिंगसाठी प्रस्तरारोहणाच्या तंत्राचा तर काही ठिकाणी वॉटर डायव्हिंग तंत्राचा वापर करावा लागतो. आतापर्यंत शोध घेतलेले सर्वात लांब भुयार ३१ कि.मी. लांबीचे आहे. नैसर्गिकरित्या या गुहांमध्ये तयार झालेल्या नानाविध रचना पाहताना आपण वेगळ्याच जगात आहोत की काय असा भास होतो. चेरापुंजीत मोसमाई नावाचे भुयार आहे. या भुयारातील मार्ग योग्य त्या सुविधा करून सोपा केलेला असल्याने पर्यटकांना या भुयाराची अनुभूती घेता येते.

# पावसाळी भटकंती

पावसाळा म्हटले की डोंगर, दऱ्या पादाक्रांत करण्यात भरपूर मजा येते. हिरव्या रंगाने नटलेले डोंगर पर्यटकांना खुणावत असतात. वीकेण्डला अशा पिकनिकची मजा लुटली की संपूर्ण आठवडा एकदम मस्त मूडमध्ये जातो. यासाठीच काही पर्यटनस्थळे..

## भिवगड

कर्जतपासून आठ किलोमीटरवरील गौरकामत गावाजवळ भिवगड/भीमगड नावाचा एक छोटा किल्ला आहे. अवघ्या अर्ध्या तासाच्या सोप्या चढाईने माथा गाठता येणाऱ्या या किल्ल्यावर पाण्याची काही टाकी, दगडी पायऱ्या आणि वाड्याचे चौथरेवगळता इतर वास्तू जवळजवळ नामशेष झाल्या आहेत. मात्र, गड-माथ्यावरून दिसणारा सभोवतालचा हिरवाकंच देखावा नजर खिळवून ठेवतो. हिरव्यागार शेतात डोक्यावर रंगीबेरंगी इरली घेऊन राबणारे शेतकरी, पाठीमागच्या ढाकच्या डोंगरावरील घनदाट वनराई, त्यातून कोसळणाऱ्या धबधब्यांच्या पांढऱ्या रेषा आणि अंग मोहरून टाकणारा गार वारा हे सारे अनुभवण्यासारखे आहे. हिरवाईच्या शौकिनांनी पावसाळ्यात आवर्जून भेट द्यावी असे हे ठिकाण. येथून जवळच एका खिंडीत मोठा धबधबा आहे. तास-दोन तासात गडफेरी आटोपून धबधब्यावर चिंब भिजण्याची मजा लुटता येऊ शकते.

## काळदुर्ग

माहीम-केळवे डोंगर रांगेतील पालघरजवळील एक छोटासा किल्ला म्हणजे काळदुर्ग. पालघर-मनोर गाडी रस्त्यादरम्यान लागणाऱ्या वाघोबाच्या खिंडीपासून सुरू होणारा घडीव पायरस्ता आपल्याला तासाभराच्या सोप्या चढाईने काळदुर्गावर घेऊन जातो. जंगल भटकंतीचा आनंद लुटत टप्प्याटप्प्याने चढणाऱ्या पायवाटेने डोंगरमाथा गाठल्यावर दृष्टीस पडणारा सभोवतालचा रम्य देखावा डोंगर चढाईचा शीण कुठल्या कुठे पळवून लावतो. सूर्या नदीचे विस्तीर्ण खोरे, सूर्या-वैतरणा संगम, क्षितिजाशी अरबी समुद्राची निळाई तर पलीकडे तांदूळवाडी किल्ल्यापर्यंत नागमोडी पसरलेली डोंगररांग. शहरी जीवनाचा विसर पाडायला लावणारे निसर्गसौंदर्य. वाघोबाच्या खिंडीतून येणारे वाहतुकीचे आवाजच काय ते आपण शहरात असल्याची जाणीव करून देतात. माथ्याच्या छोटय़ाशा विस्तारात ३-४ पाण्याची टाकी पाहायला मिळतात. बाकी अवशेष तसे फारसे काही शिल्लक नाहीत.



## खिरेश्वरचे नागेश्वर मंदिर

खळाळत वाहणारे असंख्य झरे, डोंगरदऱ्यात खोलवर उतरत जाणारे ढगांचे पुंजके, त्याआडून डोकावणारे सह्याद्रीचे कडे असे नजरेला भुरळ पडणारे निसर्गसौंदर्य भटक्यांना पावसाळ्यात माळशेज घाटात हमखास खेचून आणते. घाटातील गर्दी टाळून आवर्जून भेट द्यावे असे एक देखणे वास्तुशिल्प येथील खिरेश्वर गावी दडलेले आहे. हरिश्चंद्र गडाच्या पायथ्याचे गाव म्हणजे खिरेश्वर. घाट चढून आल्यावर काही अंतरावर लागणाऱ्या खुबी फाट्यावरून डावीकडे (मुंबईकडून नगरकडे जाताना) जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने ४ किलोमीटरच्या अंतरावर वसलेले हे छोटेसे गाव. ही कच्ची सडक म्हणजे धरणाचा बंधारा होय. त्यामुळे उजवीकडे क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळाईत आजूबाजूच्या डोंगरांचे पडलेले प्रतिबिंब पाहत असता आपण गावात कधी पोहोचतो हे समजतच नाही.



# मोहिली धबधबा

### कसे जाल ?

नाशिकहून कल्याणमार्गे कर्जतला जावे. कर्जत स्थानकावरून श्रीराम पुलावरून रिक्षाने मोहिलीकडे जाता येते. स्वतःचे वाहन असेल तर अधिक सोयीचे .

पावसाळ्यात उंच डोंगरमाथ्यावरून कोसळणारे पांढरेशुभ्र धबधबे पाहणे हे पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो. कर्जत तालुक्याला निसर्गाने मोहिली धबधबा हे देणे दिले आहे. मोहिली धबधबा हा कर्जत पासून ६ ते ७ कि.मी. लांब आहे. उल्हास नदी पार करून प्रत्यक्ष मोहिलीत प्रवेश होतो. डोंगरावरून भिरभिरणारा वारा , हिरवीगार वनराई, तेथून दिसणारा आजूबाजूचा निसर्ग असे नयनरम्य दृश्य डोळ्यांत साठवून ठेवावे असे वाटते . डोंगरमाथ्यावरून मुंबई-पुणे रेल्वेचा रस्ताही दिसतो . धबधब्याजवळ पर्यटकांची हॉटेल्स आहेत. मोहिली धबध्ध्याजवळ थंड वातावरणात गरमगरम वाफाळता चहा आणि मक्याची कणसे खाण्याची मजाच काही औरच आहे असे इथे येणारे पर्यटक सांगतात. यापुढे ७-८ किलोमीटर दूर गेल्यास कोंडाणा परिसरातही अनेक धबधबे आहेत .

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार 5 एप्रिल 2026
Last page

# गाढे पिंपळगाव येथील दिडशे वर्षांची परंपरा असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा बुधवार पासून





**परळी | वैजनाथ**

तालुक्यातील पिंपळगाव गाडे येथील श्री क्षेत्र पापंडेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन बुधवार (ता.०८) ते बुधवार (ता.१५) करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या सोहळ्यात कु. ह.भ.प. तृप्तीताई पवार यांच्या शिवकथेचे आयोजन रोज दुपारी १ ते ५ यावेळेत करण्यात आले आहे. तसेच ज्ञानेश्वरी पारायण ह.भ.प. सुभाष महाराज मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. विविध भजनी मंडळांच्या सहभागामुळे वातावरण हरिनाममय होणार आहे. या धार्मिक सोहळ्यात दररोज पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ६ ते ८ विष्णुसहस्रनाम, सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२ ते १ महाप्रसाद, दुपारी ३ ते ५ प्रवचन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० गाथा भजन व कीर्तन, तसेच हरिनाम संकीर्तन असे कार्यक्रम होणार आहेत. तर सायंकाळी ८ ते १० हरिकिर्तन ज्यामध्ये ह.भ.प. बापूसाहेब महाराज खेडूळकर, ह.भ.प. धनंजय महाराज मोकाशे, ह.भ.प. प्रभाकर महाराज झोलकर, ह.भ.प. माऊली महाराज कोल्हे, ह.भ.प. पांडुरंगजी महाराज शास्त्री परभणी, ह.भ.प. वासुदेवानंद महाराज शास्त्री दे. टाकळीकर, ह.भ.प. महंत रामकृष्ण महाराज घराणी यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भजनी मंडळ, तसेच समस्त गावकरी मंडळ यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

**दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री पापदंडेश्वराचा पालखी सोहळा मंगळवारी (ता.१४) मध्यरात्री १२ वाजता सुरू होणार असून बुधवारी (ता.१५) दुपारी १ वाजता महाआरतीने संपन्न होणार आहे. या पालखी सोहळ्यात प्रसिद्ध भारूडकार, सोंगे, गवळणींच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

## बुलढाणा येथे कुरेश कॉन्फरन्सचे भव्य चौथे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न

### बीड जिल्हाध्यक्ष कादर पाशा कुरेशी यांचा विशेष गौरव

**बुलढाणा: प्रतिनिधी**

कुरेश बिरादरीच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि व्यापारी प्रश्नांवर सखोल मंथन करण्याच्या उद्देशाने 'कुरेश कॉन्फरन्स (Regd.)' च्या वतीने चौथ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी बुलढाणा येथील राष्ट्रवादी भवन, मलकापूर रोड येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे भव्य अधिवेशन उत्साहात पार पडले.




या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे कुरेश कॉन्फरन्सचे राष्ट्रीय अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सनोबर अली कुरेशी यांची विशेष उपस्थिती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या अधिवेशनात देशभरतील कुरेश बिरादरीच्या विविध समस्यांवर आणि भविष्यातील दिशांवर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाला देशभरातून आलेल्या कुरेश कॉन्फरन्सचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अधिवेशनादरम्यान, कुरेश बिरादरीतील नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी एका विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कुरेश कॉन्फरन्सचे बीड जिल्हाध्यक्ष तथा परळी वैजनाथ नगरपरिषदेचे नगरसेवक कादर पाशा कुरेशी यांचा नुकताच नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. सनोबर अली कुरेशी आणि इतर मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. ही नियुक्ती बिरादरीसाठी अभिमानाची बाब असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. हे अधिवेशन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचे अधिवेशन ठरले. यामध्ये खालील विषयांवर प्रामुख्याने मंथन करण्यात आले.

## परळीतील व्यावसायिक विक्रम देशमुख नऊ दिवसांपासून बेपत्ता ; परळीच्या संभाजीनगर पोलीसात नोंद

**परळी** : परळीतील अडत व्यावसायिक विक्रम रमेशराव देशमुख ( कान्नापुरकर ) हे गेल्या नऊ दिवसांपासून बेपत्ता आहेत. या प्रकरणी त्यांची पत्नी यांच्या तक्रारीवरून परळीतील संभाजीनगर पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पत्नी सिमा देशमुख यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून समजलेली माहिती अशी कि,

दिनांक २७ मार्च रोजी पासुन विक्रम देशमुख बेपत्ता आहेत. दिनांक २६ रोजी रात्री घरातील सर्व मंडळींनी जेवन करुन झोपले, दुसर्या दिवशी सकाळी रुम मध्ये पाहिले असते विक्रम देशमुख दिसुन आले



नाहीत, शेजारी - पाजारी, नातेवाईक, मित्र यांना विचारले असता ते कुणालाच कुठे आहेत हे माहित नसल्याचे समजले , सर्वत्र शोधा शोध घेऊन देखील विक्रम देशमुख यांचा पत्ता लागला नाही . अखेर पत्नी सिमा देशमुख यांच्या तक्रारीवरून संभाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. देशमुख कुटुंब हे मोंढा भागात सुभाष चौक जवळील भागात वास्तव्यास आहे.

गेल्या काही दिवसांपासून आर्थिक कारणातून परेशान होते, व्याजाने पैसे घेतले होते या मुळे ते तणावात होते. असे पत्नी सिमा देशमुख यांनी तक्रारीत म्हटले आहे. एक प्रतिष्ठित व्यावसायिक बेपत्ता असल्याने अनेक चर्चा होत आहेत. संभाजीनगर पोलीस कसुन तपास करीत आहेत.

## ना .पंकजाताई मुंडे यांच्या मुळे गणेशपार व भीमनगर भागातील विजेचा प्रश्न मार्गी : अश्विन मोगरकर

### नवीन रोहित्र बसवण्याची महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**परळी (प्रतिनिधी)**

परळी शहरातील गणेशपार भागात व भीमनगर येथील कालरात्री मंदिर परिसरात विज पुरवठ्याच्या तुलनेत कमी क्षमतेचे रोहित्र असल्याने विजेचा सतत लपंडाव होत होता. भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी हा प्रश्न राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्यासमोर मांडल्यानंतर त्यांनी महावितरणला अधिक क्षमतेचा रोहित्र बसविण्याबाबत सुचना केल्यानंतर लवकरच गणेशपार व भीमनगर येथील विजेचा प्रश्न मिटणार आहे.



परळी शहरातील गणेशपार येथे असलेल्या रोहित्रावरुन देशमुख गल्ली,उखळवेस,जैन मंदिर परिसर,गवंडे गल्ली,बंगला गल्ली आदी भागात विजपुरवठा होत असतो. तसेच कालरात्री मंदिर परिसर येथील सध्या कमी क्षमतेचा रोहित्र असल्याने विजपुरवठ्यात लोड येवुन सतत विजपुरवठा खंडीत होत असल्याची ही बाब भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी नागरीकांचा हा प्रश्न राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडे मांडताच त्यांनी याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.यानंतर अश्विन मोगरकर यांनी दि.४ एप्रिल रोजी महावितरणचे अधिकारी राठोड यांना निवेदन देत पाठपुरावा केल्यानंतर महावितरणच्या कर्मचार्यांनी गणेशपार व कालरात्री मंदिर रोहित्र येथील रोहित्राची पहाणी केली आहे.याठिकाणी लवकरच अधिक क्षमतेचा रोहित्र बसविण्यात येणार असल्याने गणेशपार भागातील विजेचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे नेतृत्व ; विद्यावर्धिनी विद्यालयात कु . आभा मुंडेचा सत्कार

**परळी वैजनाथ** : विद्यावर्धिनी विद्यालय, परळी वैजनाथ येथील कु. आभा गणेश मुंडे हिने इटली येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय जागतिक पॅरा स्वीमिंग स्पर्धेत भारताचे नेतृत्व करत उल्लेखनीय कामगिरी केली. तिच्या या यशाबद्दल विद्यालयात तिचा विशेष सत्कार करण्यात आला.



या सत्कार समारंभास संस्थेचे संचालक मा. एम. टी. मुंडे साहेब, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. निला सर तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुमठाणे सर उपस्थित होते. यावेळी आभा पुढील दोन महिन्यांसाठी जलतरणाच्या विशेष सरावासाठी बेंगळुरू येथे जाणार असल्याची माहिती देण्यात आली. त्या अनुषंगाने तिचा गौरव करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याशिवाय शाळेचे अध्यक्ष एस. एस. कोळगे साहेब, संस्थेचे उपाध्यक्ष एस. बी. भिंगोरे साहेब, सचिव श्री. पी. जी. इटके साहेब तसेच संचालक पी. जे. पैंजणे साहेब, श्री. आर. पी. वाणी साहेब, श्री. चेवले साहेब, श्री. मातेकर सर आणि श्री. कराड सर यांनीही आभाचे कौतुक करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कु. आभा मुंडेच्या या यशामुळे विद्यालयासह परळी शहराचा गौरव वाढला आहे.

## आचार्य टाकळी येथे श्रीराम नवमी व हनुमान जन्मोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न!



**सिरसाळा /अतुल बडे**

आचार्य टाकळी येथील येथील ग्रामस्थांच्या वतीने श्रीराम नवमी आणि हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला 'अखंड हरिनाम सप्ताह' मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. भारत महाराज कानसुरकर यांचे सुश्राव्य कीर्तन सप्ताहाची सांगता ह.भ.प. भारत महाराज कानसुरकर (फडकरी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. सकाळी ११ ते १ या वेळेत झालेल्या या कीर्तनात महाराजांनी भक्तीचा महिमा सांगत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कीर्तनानंतर समस्त ग्रामस्थ आणि आचार्य टाकळी परिसरातील भाविकांसाठी सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

**दिग्गज कीर्तनकारांची उपस्थिती**

या सात दिवसांच्या काळात अध्यात्मिक रंगात न्हाऊन निघालेल्या या सोहळ्यात अनेक नामवंत कीर्तनकारांनी आपली सेवा रुजू केली. यामध्ये प्रमुख्याने उपस्थितीत ह.भ.प. भीमाशंकर गुरुजी एरंडेश्वरकर

ह.भ.प. विनायक महाराज काचगुंडे

ह.भ.प. दादा महाराज डिग्रसकर

ह.भ.प. आदिनाथ महाराज फपाळ (बेलुरेकर)

ह.भ.प. गजानन महाराज गोंदीकर

ह.भ.प. पांडुरंग महाराज कोकाटे

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज सोनवणे (आळंदी देवाची)

ह.भ.प. हरीदास महाराज पौळ कानसुरकर

यांनी आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधन केले.यावेळी या मंगल प्रसंगी गावातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये प्रामुख्याने

रामभाऊ तात्या घोडके (सरपंच)

तुकाराम आचार्य (चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी)

बबन जिजा आचार्य (उपसरपंच)

गजानन भैय्या आचार्य

कमलाकार काकडे (माजी सरपंच) यांच्यासह भजनी मंडळी व वारकरी मंडळी प्रतिष्ठित नागरिक, तरुण आणि महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सप्ताह दरम्यान ह.भ.प.भारत महाराज कानसुरकर यांच्याकडून शॉल,हार,श्रिफळ देऊन सिरसाळा स्वाभीमाणी पत्रकार संघ चे अध्यक्ष जनार्धन (बापू) किरवले सत्कार सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी आचार्य टाकळी येथील सर्व समस्त गावकरी मंडळींनी अहोरात्र परिश्रम घेतले. भक्तीच्या या महाकुंभामुळे संपूर्ण गाव चैतन्यमयी झाले होते.